शुक्रवार, दि. ८ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यातील 'त्या' तिन्ही योजनांच्या सर्वेक्षणासाठी चार सदस्यीय पथक मंगळवारी जालन्यात

### माजी आ. कैलास गोरंटयाल यांच्या मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल

**जालना । प्रतिनीधी -** जालना शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना व सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर या तिन्ही योजनांच्या सर्वे क्षणासाठी तज्ञ अधिकाऱ्यांचे चार सदस्यीय पथक मंगळवार दि.१२ मे रोजी जालना येथे येणार असल्याची माहिती जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देतांना गोरंटयाल म्हणाले की,उपरोक्त तिन्ही योजनांचा जागतिक बँक सहाय्यित यादीमध्ये समावेश करून प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. जालना शहरातील भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे मंत्रालयात त्यांच्या दालनात भेट घेऊन त्यांना

शहराची झपाट्याने वाढत असलेली लोकसंख्या त्यातच जालना नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये झालेले रूपांतर या बाबी निदर्शनास आणून देत वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास आवश्यक त्या प्रमाणात पायाभूत सुविधा शहरास उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करत माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी शहरातील भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले होते.जालना शहराची ४ लाख २५ हजार इतकी लोकसंख्या ग्राह्य धरुन जायकवाडी योजना तयार करण्यात आली असून सदर योजनेद्वारे सध्या जालना शहरा करीता पाण्याची मागणी ही ६० इतकी आवश्यक आहे व सदर योजनमध्ये नवीन जलशुद्धीकरण केंद्र अनुक्रमे ३५ व १५ नव्याने उभारणी करण्याचे काम पूर्णत्वाकडे आहे. सदर योजना लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार असली तरी जालना शहराची व्याप्ती झपाट्याने वाढत असून नव्याने वाड्या-वस्त्या विकसीत होत असल्यामुळे भविष्यात लोकसंख्येत होणारी वाढ लक्षात घेता सन २०४५ साली शहराची लोकसंख्या ५ लक्ष इतकी होण्याची शक्यता आहे. त्यावेळची पाणी मागणी ७५ इतकी असू शकते व सन २०६० साली ६ लाख इतकी लोकसंख्या असू शकते, त्यामुळे २०४५ साली शहराची पाणी मागणी वाढून ७५ इतकी होऊ शकते. त्यामुळे पुढील काही वर्षातच शहरातील पाणी प्रश्न पुन्हा बिकट होऊ शकतो. त्यामुळे पुढील ३० वर्षाची लोकसंख्या व पाणी मागणी विचारात घेऊन जालना शहरास नवीन पाणी पुरवठा योजना टप्पा - राबविण्याची मागणी माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केली होती.

जालना शहरामध्ये मध्ये वापरात येणाऱ्या पाण्यातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता अमृत १ अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ मध्ये ५० द.ल.लि. क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचं काम सुरू असून, त्यामध्ये नाला वळवणे, मलशुद्धीकरण केंद्र बांधणे इतक्याच उपांगांचा समावेश आहे. त्यामुळे सध्या शहरातील सांडपाणी हे उघड्या गटारातून वाहत असून, मुख्य नाल्यांना मिळालेलं असल्याने शहरात रोगराई व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवत आहे. तसेच सध्याची लोकसंख्या ग्राह्य धरून पूढील काही वर्षांत असणाऱ्या पाणी मागणीनुसार ७५ पाणी व त्यातून उत्पन्न होणारे सरासरी ६५ सांडपाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १ मध्ये उभारलेल्या ५० मलशुद्धीकरण केंद्राव्यतिरिक्त १५ मलशुद्धीकरण केंद्र उभारणे गरजेचे असल्याचे तसेच संपूर्ण शहरात कलेक्शन सिस्टम पाईप अंथरूण बंदिस्त पाईपद्वारे सांडपाणी मलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहचविणे गरजेचं आहे. त्यामुळे जालना शहराकरिता टप्पा क्र. २ अंतर्गत अतिरिक्त १५ मलशुद्धीकरण केंद्र उभारणे व संपूर्ण शहरात कलेक्शन सिस्टम योजना राबवणे गरजेचे आहे.

तसेच जालना शहरात मोठ्या प्रमाणात स्टील उत्पादन प्रकल्प असल्या कारणाने सदर कारखानदारांना स्टील आयात व इतर उपयोगासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते त्यामुळे त्यांनी पाण्याची मागणी महानगरपालिकेकडे केलेली आहे. त्याकरीता सांडपाणी प्रकल्पातून उत्पन्न होणाऱ्या पाण्यावर करून सदर

पाणी पुनर्वापरात आणण्यासाठी प्रकल्प उभारणी करणे सुद्धा आवश्यक आहे. जालना शहरास स्वच्छ व निरोगी बनविण्यासाठी आपल्या सहकार्याने सूधारीत पाणी

पुरवठा योजना, भुयारी गटार योजना व सांडपाणो व्यवस्थापन व पुनर्वापर योजना ( ) या सर्व योजनांचा जागतिक बँक अर्थ सहाय्य यादीत समावेश करून या तिन्ही योजनांना प्रशासकीय मंजूरी द्यावी अशी आग्रही मागणी माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.दरम्यान, या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेऊन जालन्यातील उपरोक्त तिन्ही योजनांचे सर्वेक्षण करण्यासाठी तज्ञ अधिकाऱ्यांचे चार सदस्यीय पथक जालना येथे पाठवण्याचा निर्णय घेतला असून पथकातील अने, मृत्य, श्रीनिवास आणि रिद्धिमान या चार अधिकाऱ्यांचा समावेश असलेले पथक मंगळवार दि.१२ मे रोजी जालना शहरात दाखल होणार असल्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

## जालन्यात राज्य कामगार योजनेअंतर्गत १०० खाटांचे रुग्णालय सुरू करा

### माजी आ.कैलास गोरंटयाल यांची आग्रही मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर औद्योगिक क्षेत्रात राज्यात अग्रेसर असून जालना स्टील क्लस्टरमुळे या शहराची ओळख संपूर्ण भारतात आहे. ही बाब लक्षात घेऊन जालन्यात राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत (ईएसआयसी) १०० खाटांचे रुग्णालय मंजूर करावे अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणी बाबत सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे गोरंटयाल यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन दिलेल्या पत्रात माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी म्हटले आहे की,

जालना शहर हे स्टील क्लस्टर मुळे ओळखल्या जाते. या क्लस्टरमध्ये मोठ्या प्रमाणात लोखंड व पोलाद उत्पादन करणारे कारखाने कार्यरत आहेत. या पार्श्वभूमीवर येथील कामगाराच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी जालना येथे स्वतंत्र ईएसआयसी रुग्णालय सुरू करण्याची आवश्यकता असून जालना स्टील क्लस्टरमध्ये अनेक रोलिंग मिल्स आणि फर्नेस युनिटस् कार्यरत आहेत. या कारखान्यांमध्ये अत्यंत उच्च तापमानात आणि जड मशिनरी सोबत कामगार काम करत असतात, कामाच्या जोखमीच्या स्वरुपामुळे अपघात किंवा आपत्कालीन वैद्यकीय मदतीची गरज येथे वारंवार भासते.अशा वेळी वेळेवर उपचार मिळण्यात अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले. जालना आणि लगतच्या औद्योगिक क्षेत्रात, बिडी कामगार व ईतर नोंदणीकृत अंदाजे ६० ते ७० हजार कामगार असून लाभार्थी संख्या: कामगार व त्यांचे कुटूंबिय मिळुन अंदाजे २ लाख ५ हजार नागरिक या योजनेवर अवलंबुन आहेत. ईएसआयसीच्या निकषानुसार, ज्या क्षेत्रात ५० हजार पेक्षा जास्त दिमित व्यक्ती आहेत, तिथे १०० खाटांचे रुग्णालय मंजूर करण्याचे शासनाचे धोरण असल्याने आणि जालना जिल्हा सदर निकष पूर्ण करत आहे. जालना येथील जालना इंडस्ट्रीयल असोसिएशन विविध कामगार संघटना आणि स्थानिक पान २ वर

### निकषास पात्र, जमीनही उपलब्ध अन् प्रस्तावही तयार

राज्य कामगार विमा योजना (ईएसआयसी) १०० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास जालना शहर पात्र असून कामगारांच्या संख्येचे निकष देखील पूर्ण करत आहे. शिवाय सदर रुग्णालयासाठी आवश्यक असणारी जवळपास १० एक्कर जमीन जालना महापालिका आणि औद्योगिक वसाहतीमध्ये उपलब्ध असून रुग्णालयातील आवश्यक बाबींचा अंतर्भाव असणारा प्रस्ताव देखील तयार असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनीही याबाबत सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घेण्याची ग्वाही दिल्याचे गोरंटयाल यांनी सांगितले.

## प्रशासन अणि लोकप्रतिनिधींत समन्वय आवश्यक - उपमहापौर राजेश राऊत



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील पाणी, स्वच्छता, रस्ते आदीकडे लक्ष देऊन नागरी सुविधांना गती द्यावी, अशी मागणी जालना महानगर पालिकेचे महापौर वदना मगरे उपमहापौर राजेश राऊत यांनी आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे केली आहे.

महापौर वंदनाताई मगरे उपमहापौर राजेश राऊत आयुक्त अंजली शर्मा यांची भेट घेऊन त्यांना शहरातील विविध समस्या संदर्भातील २९ मागण्यांचे निवेदन सादर करून त्यांचे लक्ष वेधले.

या निवेदनात महापौर मगरे उपमहापौर राऊत यांनी म्हटले आहे की, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर तीन महिन्यांपूर्वी लोकनियुक्त महापौर, उपमहापौरांची निवड झाली. पुर्णवेळ आयुक्त म्हणून आपणास पदभार स्वीकारल्यानंतर महिना भराचा कालावधी होत आला आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर म्हणून मी स्वतः राजेश राऊत आम्ही शहरातील स्वच्छतेसह नागरी सुविधांवर लक्ष केंद्रित केले आहे. तथापि शहरातील नागरी सुविधा गतीमान करणे आवश्यक आहे . प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ही मनपाची दोन चाके असून यात समन्वय साधणे आवश्यक आहे. नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे, रस्ते, रस्त्यावरील खड्ड़े दुरुस्ती प्रशासनाची कामे असून त्यावर लोकप्रतिनिधीचे नियंत्रण असावे, जालना शहराला घाणेवाडी पान २ वर

## नदी स्वच्छ ठेवता येत नसेल तर प्रशासन कशासाठी?

### कुंडलिका नदीत मृत कोंबड्या टाकल्याने संताप; समस्त महाजन ट्रस्टच्या नूतन देसाई आक्रमक

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील कुंडलिका आणि सीना नद्यांच्या स्वच्छतेसाठी वर्षानुवर्षे लोकवर्गणीतून काम करणाऱ्या समस्त महाजन ट्रस्टने आता प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. कुंडलिका नदीत मृत कोंबड्या टाकून नदी पुन्हा अस्वच्छ करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर ट्रस्टच्या अधिकारी नूतन देसाई यांनी तीव्र संताप व्यक्त करत ''नदी घाण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा, अन्यथा आम्ही पूर्णवेळ उपोषण करू,'' असा थेट इशारा प्रशासनाला दिला आहे.

नूतन देसाई म्हणाल्या की, ''आम्ही मुंबईहून जालन्यात येऊन तब्बल आठ-आठ वर्षे मेहनत घेत लोकवर्गणीतून कुंडलिका आणि सीना या दोन्ही नद्या स्वच्छ केल्या. अनेक सामाजिक संस्था आणि नागरिकांनी यात हातभार लावला. नदीचे खोलीकरण, रुंदीकरण करून तिचे अस्तित्व वाचवले. मात्र नदी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महापालिका आणि प्रशासनाची असताना त्यांच्याकडून पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे.''

कुंडलिका नदीत मृत कोंबड्या फेकल्याची माहिती मिळताच नूतन देसाई यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. नदीत टाकण्यात आलेल्या घाणीमुळे त्यांनी संताप व्यक्त करत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका केली.

यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र फोन उचलला गेला नसल्याचा आरोप त्यांनी केला. त्यानंतर महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांना फोन करून संपूर्ण प्रकाराची माहिती देण्यात आली. आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवले, मात्र ''घटना घडल्यानंतर कर्मचारी पाठवण्यापेक्षा अशी घाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे,'' अशी नाराजी देसाई यांनी व्यक्त केली.''नद्यांची स्वच्छता ही केवळ सामाजिक संस्थांची जबाबदारी नाही. प्रशासनाने कठोर पावले उचलली नाहीत, तर नदी पुन्हा गटार बनण्यास वेळ लागणार नाही,'' असा इशाराही त्यांनी दिला.



### नदीपात्रात मृत कोंबड्या टाकणाऱ्या अज्ञात वाहनचालका विरुद्ध गुन्हा दाखल

शहरातील रामतीर्थ स्मशानभूमी परिसरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात मृत कोंबड्या टाकून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण केल्याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जालना महानगरपालिकेतील प्रभारी स्वच्छता निरीक्षक मॅथ्यु वर्गीस चाको (वय ४५) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, ७ मे २०२६ रोजी रामतीर्थ स्मशानभूमी परिसरातील नदीपात्रात पिकअप वाहन क्रमांक एमएच २१ बीएच ९७४२ मधून अंदाजे १०० ते १२५ मृत कोंबड्या पान २ वर

## शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी डिजिटल स्व-गणना नोंदणी करावी-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** भारत सरकारच्या आगामी १६ व्या जनगणना-२०२७ प्रक्रियेअंतर्गत नागरिकांनी डिजिटल स्व-गणना ( ) प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यासंदर्भात गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी जालना आशिमा मित्तल यांनी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना सूचना जारी केल्या आहेत.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, देशातील १६ वी जनगणना जानेवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत दोन टप्प्यात पार पडणार आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी भारत सरकारच्या ://... या संकेतस्थळावर डिजिटल स्व-गणना प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### अधिकारी-कर्मचारी आणि जिल्ह्यातील नागरिकांनी १५ मे पूर्वी ऑनलाइन माहिती भरावी

ही ऑनलाइन स्व-गणना प्रक्रिया १ ते १५ मे, २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असून, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतःची डिजिटल स्व-गणना पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संबंधित कार्यालयांतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही ही प्रक्रिया निश्चित मुदतीत पूर्ण करावी. ज्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही किंवा प्रक्रिया अपूर्ण ठेवली आहे, त्यांनी तातडीने नोंदणी पूर्ण करून त्याचा प्रमाणित अहवाल सादर करावा. संबंधित कार्यालयांनी १५ मे २०२६ पर्यंत डिजिटल स्व-गणना पूर्ण करून १६ मे, २०२६ रोजी पर्यंत संख्यात्मक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी देखील या सुविधेचा लाभ घेऊन स्वतः ची व कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदवावी. असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## पनीरच्या नावाखाली 'चीज ॲनालॉग' विक्रीवर करुन ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट व केटरर्सवर अन्न व औषध प्रशासन करणार कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** पनीरच्या नावाखाली स्वस्त दरातील 'चीज ॲनालॉग' विक्री करून ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स तसेच फास्ट फूड विक्रेत्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा सुरक्षित अन्न व पोषक आहार समितीच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांनी संबंधित मोहिमेचा आढावा घेतला. यावेळी जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स, फास्ट फूड विक्रेते तसेच पनीर व चीज ॲनालॉग उत्पादकांची व्यापक तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

*पनीर आणि चीज ॲनालॉगमधील फरक*

अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ''पनीर'' हा पदार्थ पूर्णपणे दुधापासून तयार केला जातो. तर ''चीज ॲनालॉग'' तयार करताना दुधासोबत किंवा त्याऐवजी खाद्यतेल, स्टार्च, इमल्सिफायर व इतर घटकांचा वापर केला जातो.

ग्राहकांनी घ्यावी ही काळजी

अन्न व औषध प्रशासनाने ग्राहकांना खरेदी करताना काही बाबींची विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पॅकबंद पनीर खरेदी करताना त्यावरील लेबल तपासावे. सुटे पनीर घेताना ते शुद्ध दुधाचे असल्याची खात्री करून संशय आल्यास बिल घ्यावे. तसेच हॉटेलमध्ये पदार्थ ऑर्डर करण्यापूर्वी मेन्यूकार्डवर 'पनीर' आणि 'ॲनालॉग' असे स्वतंत्र पर्याय नमूद आहेत का, हे तपासावे.

हॉटेल व्यावसायिकांसाठी पान २ वर

## संपादकीय पान

# निवडणुकीत होणारी हिंसा अयोग्य

निवडणुका आणि हिंसा हे आपल्या लोकशाहीला नवे नाही. निवडणुकीत हिंसाचार होतोच मग ती ग्रामपंचायतीची निवडणूक असो की विधानसभा, लोकसभेची. हिंसाचार झाल्याशिवाय निवडणुका पार पडत नाहीच असा आपला अनुभव आहे. विशेषतः उत्तर भारतीय हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यात तर निवडणुका आणि हिंसाचार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या आहेत. त्यामानाने महाराष्ट्रात खूप चांगली परिस्थिती आहे. आपल्या राज्यातील निवडणुकीत हिंसाचाराचे प्रमाण तुरळक असते. पण इतर राज्यात मात्र निवडणुकीआधी किंवा निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होतो. आता पश्चिम बंगालचेच पहा ना या राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होताच मोठा हिंसाचार उसळला. निवडणुकीचा निकाल घोषित होताच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यात हाणामारी, मारामारीच्या घटना घडल्या. इतकेच नाही तर तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनाही घडल्या. या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांची हत्या झाली तर शेकडो कार्यकर्ते जखमी झाले. भाजपचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार व वरिष्ठ नेते सुवेंदु अधिकारी यांचे पी ए चंद्रनाथ रथ यांचीही गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. पोलिसांनी हिंसाचार प्रकरणी ४०० कार्यकर्त्यांना अटक केली असून तेथील परिस्थिती तणावपूर्ण आहे. हा हिंसाचार थांबण्यासाठी पोलिस दल सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे पण परिस्थिती नियंत्रणाबाहेर चालली आहे. अर्थात पश्चिम बंगालला निवडणुकीतील हिंसाचार नवा नाही. मागील विधानसभा निवडणुकीच्या आधीही तिथे असाच हिंसाचार उसळला होता. तेंव्हा झालेल्या हिंसाचारात तर ३५ जणांची हत्या झाली होती इतकेच नाही तर त्यावेळी हिंसाचारात बॉम्बचस्फोट देखील करण्यात आला होता. आताही जवळपास तशीच परिस्थिती बंगालमध्ये आहे. हा हिंसाचार भाजपचे नेते आणि कार्यकर्ते घडवून आणत आहेत असा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे तर ममता बॅनर्जींच्या इशाऱ्यावर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते पश्चिम बंगालमध्ये हिंसा घडवून आणत आहेत असा आरोप भाजपतर्फे केला जात आहे. हे दोन्ही पक्ष हिंसाचार प्रतिस्पर्धी पक्षाने घडवून आणला असा आरोप करत असले तरी हिंसाचारात दोन्ही बाजूचे कार्यकर्ते सहभागी असल्याने या हिंसाचारास भाजप आणि तृणमूल हे दोन्ही पक्ष तितकेच जबाबदार आहेत असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या या राजकीय हिंसाचाराचे समर्थन कोणी करणार नाही. हिंसा ही निषेधार्हच असते. लोकशाहीत हिंसेला थारा नाही. पश्चिम बंगालमधील या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांचा बळी गेला ही चिंताजनक बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी तर ही भयावह अशीच बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी हे शुभचिन्ह नाही वास्तविक लोकशाहीत हिंसेला स्थान नाही. पण सध्या जे घडत आहे त्याने लोकशाहीचे धिंडवडे निघत आहे. निवडणुकीत होणारी हिंसा कमी करण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस धोरण आखायला हवे. हिंसाचारास जबाबदार असणाऱ्या राजकीय नेत्यांवर व पक्षांवर बंदी आणून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायला हवी. निवडणूक आयोगाने हिंसामुक्त निवडणुकीसाठी कठोर पावले उचलायला हवीत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे

दरवर्षीप्रमाणे ८ मे रोजी जागतिक थॅलेसेमिया दिन साजरा करण्यांत येतो. या दिवशी थॅलेसेमिया आजाराची समाजामध्ये माहिती, जनजागृती व्हावी हा दृष्टीकोनातुन मार्गदर्शन करण्यांत येतो. थॅलेसेमिया हा आजार रक्ताशी संबंधीत आहे. या वर्षीची थीम 'आता लपुन न राहताः निदान न झालेल्या रुग्णांना शोधणे. दुर्लक्षित रुग्णांना आधार देणे' '' : . .'' याची आपण अमंलबजावणी १०० टक्के केली तर निश्चितचं एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे असणारं. थॅलेसेमिया हा आजार अनुवांशिक आहे. कारण पालकांकडुन मुलांना हा आजार होतो. सामान्य मानवाच्या शरीरामध्ये लाल रक्तपेशींचे आयुष्य १२० दिवस असते. थॅलेसेमिया या आजारामध्ये लाल रक्त पेशींचे आयुष्य २० ते २२ दिवस असते. त्यामुळे थॅलेसेमिया ग्रस्त मुलांचे हिमोग्लोबीन कमी होत असल्यामुळे त्यांना वारंवार रक्त द्यावे लागते. हिमोग्लोबीन कमी होत असल्यामुळे थॅलेसेमिया हा धोकादायक आजार आहे. या आजारापासुन मुक्त होण्यसाठी लस किंवा औषधी उपलब्ध नाही. भारतामध्ये अंदाजे १ लाख थॅलेसेमिया रुग्ण असुन दरवर्षी १०००० रुग्णांची वाढ होते.

लक्षणे : अशक्तपणा, थकवा, नखे, डोळे व जीभ फिकट होणे, त्वचेवर पिवळसर रंग येणे, शारीरिक वाढ मंदावणे, ओटीपोटीत दुखणे.

प्रकार : थॅलेसेमिया या आजाराचे दोन प्रकार मेजर व मायनर आहेत. मेजर या प्रकारामध्ये पती पत्नी या दोघांच्याही गुणसुत्रामध्ये दोष असतो. मायनर या प्रकारामध्ये पती किंवा पत्नी या दोघापैकी एकाच्या गुणसुत्रामध्ये दोष असतो. पालकांच्या गुणसुत्रातील दोषामुळे थॅलेसेमिया हा आजार होतो. याचे रोग निदान रक्त तपासणीद्वारे होते.




उपचार : बोन मॅरो ट्रान्सप्लांट हा एकमेव खर्चिक उपचार आहे किंवा नियमित २० ते २५ दिवसांनी बालकांना बाहेरुन रक्त देणे. तज्ज्ञ वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित उपचार घेणे.

आवाहन : वेळेवर निदान, उपचार आणि प्रतिबंध या त्रिसुत्रीचा वापर करण्यासाठी जनजागृती करु या.

**डॉ. जयश्री भुसारे**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जालना.**

# महाराणा प्रताप ना कभी हारे;ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली. अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला. हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला. आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही. अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सार्वजनिक रस्ते उद्योगांच्या मालकीचे नाहीत, झारखंड उच्च न्यायालयाचा दणका; महाराष्ट्रानेही बोध घ्यावा: ॲड. महेश धन्नावत

उद्योग त्यांच्या व्यावसायिक फायद्यासाठी सार्वजनिक रस्त्यांचा वापर करून सामान्य प्रवाशांना वेठीस धरू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल झारखंड उच्च न्यायालयाने दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती एम. एस. सोनक आणि न्यायमूर्ती राजेश शंकर यांच्या खंडपीठाने एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना, स्टील प्लांटजवळ वैधानिक पार्किंग नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याचे आणि पुरेशा ट्रॉमा केअर सुविधा विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत. हा निर्णय औद्योगिक क्षेत्राजवळील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या आणि हक्कांच्या दृष्टीने एक मैलाचा दगड मानला जात आहे.

सरायकेला-खरसावन जिल्ह्यातील राजनगर येथील चालियामा स्टील प्लांट भोवती पार्किंग सुविधांचा अभाव आणि रस्ते सुरक्षेच्या समस्यांबाबत नागेश्वर आचार्य आणि इतर विरुद्ध झारखंड राज्य आणि इतर या नावाने जनहित याचिका (क्रमांक ६८२/२०२५) दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांनी आरोप केला होता की, प्लांटमध्ये अवजड वाहनांसाठी निश्चित पार्किंगची जागा नसल्यामुळे, ट्रक सार्वजनिक रस्ते आणि महामार्गांचा वापर पार्किंगसाठी करत आहेत, ज्यामुळे वारंवार अपघात होत असून कामगार आणि सामान्य नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. हे झारखंड बिल्डिंग बाय-लॉज, २०१६ च्या नियम ४१ चे थेट उल्लंघन असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले, ज्यानुसार औद्योगिक युनिट्ससाठी अंतर्गत पार्किंगची तरतूद करणे अनिवार्य आहे. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, प्लांटच्या आवारात पार्किंगची सोय नसल्यामुळे, अवजड वाहने सार्वजनिक रस्त्यांचा वापर तात्पुरत्या पार्किंग क्षेत्रासारखा करत आहेत, ज्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि इतर प्रवाशांसाठी रस्त्याची जागा कमी होते. न्यायालयाने स्पष्ट केले, ''स्टील प्लांटच्या व्यावसायिक हितासाठी आणि त्यांनी वैधानिक पार्किंग नियमांचे पालन न केल्यामुळे, सर्वसामान्य जनतेला आणि करदात्यांच्या पैशातून बनवलेल्या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. उद्योगांना रस्ते वापरण्याचा अधिकार आहे, परंतु तो वापर वाजवी असावा, न्यायालयाने भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत आरोग्याच्या अधिकारावर भर देत, औद्योगिक क्षेत्राजवळ अपघातग्रस्तांसाठी वैद्यकीय सुविधांची कमतरता असल्याचे नमूद केले. प्रशासकीय निष्क्रियतेमुळे नागरिकांच्या या मूलभूत अधिकाराचे हनन होऊ शकत नाही, असे बजावत न्यायालयाने राज्य सरकारला तातडीने ट्रॉमा केअर सुविधा उभारण्याचे निर्देश दिले. यासाठी स्टील प्लांटच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीचा वापर करण्याची शक्यता तपासण्यासही सांगितले. न्यायालयाने अंतर्गत पार्किंगची अंमलबजावणी, सार्वजनिक रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंगवर बंदी आणि १८ महिन्यांच्या आत पार्किंग झोन व ट्रॉमा केअर सुविधा विकसित करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी म्हटले आहे की, ''झारखंड उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ त्या राज्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी, विशेषतः महाराष्ट्र आणि जालनासारख्या औद्योगिक शहरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. उद्योगांच्या सोयीसाठी नागरिकांच्या हक्कांना डावलले जाऊ शकत नाही, हा एक मोठा संदेश या निकालाने दिला आहे. ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''महाराष्ट्र सरकारने आणि स्थानिक प्रशासनाने या निकालातून प्रेरणा घेऊन, कोणत्याही जनहित याचिकेची वाट न पाहता, स्वतःहून औद्योगिक क्षेत्रातील पार्किंग नियमांची कठोर अंमलबजावणी करावी. उद्योगांना त्यांच्या आवारात पुरेशी पार्किंगची जागा उपलब्ध करून देण्यास भाग पाडले पाहिजे. तसेच, प्रत्येक औद्योगिक वसाहतीजवळ उद्योगांच्या सीएसआर निधीतून सुसज्ज ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची सक्ती केली पाहिजे. कायदा सर्वांसाठी समान आहे आणि व्यावसायिक नफ्यासाठी सार्वजनिक पायाभूत सुविधांवर अतिक्रमण करण्याचा अधिकार कोणालाही नाही, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.''

पान १ वरुन

## जालन्यात राज्य ...

लोकप्रतिनिधींकडून गेल्या अनेक वर्षापासून या रुग्णालयाची सातत्याने मागणी होत आहे. छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालय ६० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्याने, आपत्कालीन परिस्थितीत कामगारांना वेळ आणि पैसा दोन्हीचा मोठा भुर्दंड सोसावा लागत आहे. विशेष म्हणजे या रुग्णालयासाठी आवश्यक असणारी ५ से १० एकर जमीन जालना महानगरपालिका आणि औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. रुग्णालयाच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यात प्रामुख्याने स्टील क्लस्टरमधील संभाव्य धोके लक्षात घेता, बर्न युनिट आणि ट्रॉमा सेंटरला या रुग्णालयात प्राधान्य देण्यात येईल. जालना येथे सदर रुग्णालय व्हावे यासाठी स्थानिक इंडस्ट्रीयल असोसिएशन व कामगार संघटनांचा देखील पाठिंबा असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी या पत्रात नमूद केले आहे. जालना येथील स्टील उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील योगदान आणि कामगारांच्या आरोग्याची जोखीम लक्षात घेता, केंद्र सरकारच्या ईएसआयसी महामंडळाकडे या १०० खाटांच्या रुग्णालयाची शिफारस तातडीने करण्यात यावी, यामुळे जालन्यातील औद्योगिक वसाहतीतील कामगारांचे आरोग्य अबाधित राहण्यास मोठी मदत होईल असेही माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी या पत्रात स्पष्ट केले आहे.

## प्रशासन आणि ...

जलाशय आणि जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा होतो, दोन्ही स्रोतांतून शहरात येणारे पाणी आणि प्रत्यक्ष नळांद्वारे होणारा पाणी पुरवठा इत्यादी बाबत असणारा पाणीपुरवठ्यातील विस्कळीतपणा दूर करून दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात यावा, घाणेवाडी जलाशयातून नवीन जालना भागात चार एमएलडी पाणीपुरवठा होतो. जे. ई. एस. महाविद्यालयाजवळ १.५ एम.एल. डी. फिल्टर बेल्ट चे काम अनेक दिवसांपासून रेंगाळत पडलेले आहे. या कामास गती देऊन सदरील काम पुर्णत्वाकडे नेण्यात यावे, जायकवाडी धरणातून येणाऱ्या १८ एम. एल. डी. पाण्यातून जुना जालना भागात पाणी पुरवठा होतो, अंबड येथे उभारण्यात येत असलेल्या ३५ एम.एल. डी. फिल्टर बेल्ट चे अपूर्ण काम पूर्ण करावे,

शहरात एकूण ९५९ विधन बिहिरी (हातपंप) असून २९५ कार्यान्वित आहेत तर २३५ सुरू करता येतील. तसेच विद्युत मोटार बसवलेले ५३ हातपंप कुशल मनुष्यबळ पुरवठा केल्यास उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या झळांपासून शहरवासीयांना मुक्ती मिळेल तसेच पाणीपुरवठा करता येईल.) शहरात एकूण २१ टाक्या असून घाणेवाडी जलाशय आणि जायकवाडी धरण दोन्ही मिळून २२ एम.एल. डी. पाणी पुरवठा होतो. वाढती लोकसंख्या नवीन वसाहती लक्षात घेता जायकवाडीतून ३५ आणि घाणेवाडीतून उर्वरित १५ एम. एल. डी. ची भर घातल्यास शहरातील सर्व वसाहतींना सुरळीत पाणीपुरवठा करता येईल. नवीन घरे, इमारती, फ्लॅट, रो- हाऊस बांधताना जलपुनर्भरण करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही. तो होण्यासाठी स्वतंत्र पथक नियुक्त करावे, घन कचरा प्रकल्प सुरळीत चालू करावा, घंटागाडी द्वारे शहरातील प्रत्येक कॉलनी, वसाहती, वस्त्या, झोपडपट्टी भागातील, कचऱ्याचे दररोज संकलन करावे, अमृतवन आणि जलशुद्धीकरण केंद्र येथे ''बायोमिथेनेशन'' चे उभारलेले प्रकल्प चालू करून गॅस आणि वीज निर्मिती करावी.

## नदी पात्रात ...

आणून टाकल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच संसर्गजन्य रोग फैलावण्याची शक्यता निर्माण झाले. तसेच नदीपात्रात मृत कोंबड्या टाकून सार्वजनिक पाणी स्रोतात प्रदूषण करुन वातावरण आरोग्यास धोका निर्माण केल्याचा आरोप संबंधीतावर करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम २७१, २७२, २७९, २८०, आणि २९१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ. श्री. जाधव करीत असल्यचे प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## पनीरच्या नावाखाली ...

सूचना अन्न व औषध प्रशासनाकडे अनेक हॉटेल व्यावसायिक ग्राहकांना कोणतीही माहिती न देता स्वस्त दरातील चीज किंवा पनीर ॲनालॉग वापरत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आता ज्या हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये चीज ॲनालॉगचा वापर केला जातो, त्यांनी मेन्यूकार्ड अथवा डिस्प्ले बोर्डवर त्याचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक राहणार आहे. याशिवाय हॉटेल चालकांनी पनीर ॲनालॉग किंवा चीज ॲनालॉग खरेदी करताना बिलावर संबंधित पदार्थाचा स्पष्ट उल्लेख असल्याची खात्री करूनच खरेदी करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

शाकाहारींसाठी पनीर हा प्रथिनांचा महत्त्वाचा स्रोत मानला जातो. मात्र काही व्यावसायिक आर्थिक फायद्यासाठी कमी दर्जाच्या घटकांचा वापर करून पनीरसदृश पदार्थ विकत आहेत. यावर प्रतिबंध घालण्यासाठी आणि नागरिकांना सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्न उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत.

# रामतीर्थ स्मशानभूमीजवळील कुंडलिका नदीत मृत कोंबड्यांचा खच; परिसरात दुर्गंधीचा कहर

''नदीत मृत कोंबड्या फेकणाऱ्यांसह महापालिका अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षकांवर गुन्हे दाखल करा''

## सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांची आक्रमक मागणी

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक ७ गुरुवार रोजी दुपारी १ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कुंडलिका नदीचे विदारक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. रामतीर्थ स्मशानभूमीजवळील जालनाछत्रपती संभाजीनगर रोडवरील पुलाखाली शेकडो मृत कोंबड्यांचा खच पडलेला आढळून आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पुलाखाली तब्बल १५० ते २०० मृत कोंबड्या टाकण्यात आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, भरदिवसा कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या गाड्या नदी परिसरात उभ्या राहत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. अज्ञात व्यक्तींनी मृत कोंबड्या थेट नदीपात्रात फ ेकल्याने नदीतील पाणी दूषित झाले असून पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना देखील असह्य दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

या गंभीर प्रकाराकडे महानगरपालिका प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी संतप्त प्रतिक्रिया देत मृत कोंबड्या नदीत फेकणाऱ्या अज्ञातांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या महापालिका अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षकांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी स्थानिक नागरिकांनी मनपा प्रशासनावर आरोप केला की त्यांनी वेळोवेळी मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना फोनवरून माहिती देण्याचा प्रयत्न केला परंतु कोणीही अधिकारी कर्मचारी नागरिकांचे फोन उचलत नसून त्यांच्या समस्या जाणून घेण्यास तयार नसल्याच्या गंभीर आरोप नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे. कुंडलिका नदीमध्ये नदीपात्रामध्ये मृत कोंबड्या आढळून आल्याने अनेक नागरिकांनी मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले परंतु कोणीही अधिकारी यांनी प्रतिसाद दिला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे

लाखो-कोट्यवधी रुपये खर्च करून विविध सामाजिक संघटनांनी कुंडलिका नदी स्वच्छ करण्यासाठी राबवलेल्या मोहिमांवर आता पाणी फिरत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आणि अधिकाऱ्यांच्या निष्काळजी धोरणामुळे शहराची नाडी मानली जाणारी कुंडलिका नदी आज घाणीच्या विळख्यात अडकली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



# कौटुंबिक वादातून जावयाची भरचौकात निर्घृण हत्या; चंदनझिरा परिसरात तणाव

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील चंदनझिरा भागातील वर्दळीच्या एकता चौकात आज (गुरुवार, ७ मे २०२६) सायंकाळी एका तरुणाची धारदार शस्त्राने सपासप वार करून हत्या करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मयत तरुणाचे नाव जितेंद्र रवी अडसूळ (वय ३५) असून तो मूळचा बदनापूर येथील रहिवासी होता. जितेंद्र हा चंदनझिरा परिसरातील एका कुटुंबाचा जावई होता. प्राथमिक माहितीनुसार, जितेंद्र आपल्या पत्नीला माहेरहून नेण्यासाठी आला होता. मात्र, यावेळी त्याचा सासरा आणि मेहुण्यासोबत जोरदार वाद झाला.

हा वाद इतक्या विकोपाला गेला की, एकता चौक परिसरात हल्लेखोरांनी जितेंद्रवर दबा धरून अचानक हल्ला चढवला. धारदार शस्त्राने त्याच्यावर एकामागून एक ४ ते ५ वार करण्यात आले. हल्ल्याची तीव्रता इतकी भीषण होती की, जितेंद्र रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

तपासाची चक्रे फिरली

घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (-) जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला आहे. हत्येचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झाले नसले तरी, कौटुंबिक कलह आणि जुना वाद हेच मुख्य कारण असल्याची चर्चा घटनास्थळी आहे.

पोलीस कारवाई: आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी तात्काळ दोन विशेष पथके रवाना केली आहेत.

पुरावे: परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले जात आहेत.

सुरक्षा: घटनेनंतर परिसरात निर्माण झालेला तणाव पाहता चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




जालन्याचे नूतन पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू यांनी पदभार स्वीकारताच ही मोठी घटना घडल्याने, शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी पोलीस प्रशासन आता काय पावले उचलणार, याकडे सर्व जालनावासियांचे लक्ष लागले आहे.

ही माहिती प्राथमिक तपासावर आधारित असून, पोलिसांच्या अधिकृत अहवालानंतर आणि शवविच्छेदन अहवालानंतर हत्येचा नेमका घटनाक्रम स्पष्ट होईल.

# अ.भा. लोकहित महासंघाच्या जालना जिल्हा उपाध्यक्षपदी बशीर खान यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनीधी -** अखिल भारतीय लोकहित महासंघाची मासीक बैठक नुकतीच महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी.जे. यांच्या अध्यक्षतेखाली श्री बलराज कॉर्नर, मिया साब दर्गा रोड जालना येथे उत्साहात संपन्न झाली. यावेळी जालना जिल्हयातील तसेच ईतर अनेक सामाजीक विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी महासंघाचे वरिष्ठ व सक्रीय कार्यकर्ते बशीर खान मुनीर खान रा. चौधरी नगर, जालना यांची जालना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. महासंघाच्या माध्यमातुन आपल्या परीसरातील तसेच समाजातील सर्व घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध रहावे असे आदेश महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी.जे. यांनी बशीर खान यांना दिले आहेत, तर बशीर खान यांनीही महासंघाच्या माध्यमातुन सर्व जाती धर्मातील, सर्व स्तरातील नागरीक, महिला, विद्यार्थी, कामगार यांच्या प्रश्नांसाठी तन मन धनाने लढणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी महासंघाचे अजिम खान, प्रदिप दिव्यवीर, मो. मारूफ खान, महिला प्रतिनीधी श्रीमती शेख मेहजबीन, श्रीमती गिता संगम, श्रीमती करूणा निरेवाड यांची उपस्थिती होती. बशीर यान यांच्या निवडीचे सर्व सभासदांनी तसेच त्यांच्या मित्र परीवाराने अभिनंदन केले आहे.

# जालना पोलीस अधीक्षकांचा तुघलकी फतवा; कायदा-सुव्यवस्थेचे अपयश लपवण्यासाठी दुकानदारांवर गदा?

**जालना । प्रतिनिधी -** शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरलेले पोलीस प्रशासन आता आपले अपयश लपवण्यासाठी सर्वसामान्य व्यावसायिक आणि नागरिकांवर निर्बंध लादत आहे, असा थेट आरोप ॲड. महेश धन्नावत यांनी केला आहे. पोलीस अधीक्षक, आयपीएस तेघबीर सिंग संधू यांनी मुंबई पोलीस कायदा, कलम ३३ डब्ल्यू चा आधार घेत दुकाने बंद ठेवण्याबाबत काढलेले परिपत्रक हे पूर्णपणे बेकायदेशीर, सरकारच्या धोरणात्मक निर्णयाचे उल्लंघन करणारे आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशांना केराची टोपली दाखवणारे आहे, असे ॲड. धन्नावत यांनी म्हटले आहे. ॲड. महेश धन्नावत यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे आपली भूमिका मांडताना म्हटले आहे की, ''महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ नुसार राज्यात मद्य विक्री करणाऱ्या आस्थापना वगळता इतर सर्व दुकाने आणि आस्थापना २४ तास सुरू ठेवण्यास परवानगी आहे. यासंदर्भात राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजी एक स्पष्ट परिपत्रक काढून सर्व स्थानिक प्रशासकीय आणि पोलीस विभागांना सूचना दिल्या आहेत. या परिपत्रकाची प्रत पोलीस महासंचालकांना देखील पाठवण्यात आली आहे. असे असतानाही, जालना पोलीस अधीक्षकांनी काढलेला आदेश म्हणजे चोरांना सोडून संन्याशाला फाशी देण्यासारखा प्रकार आहे.'' ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, ''मुंबई उच्च न्यायालयाने ॲक्सलरेट प्रॉडक्ट्स व्हेंचर्स प्रा. लि. विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात स्पष्टपणे नमूद केले आहे की, २०१७ च्या कायद्यानुसार दुकाने २४ तास सुरू ठेवण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नाही आणि पोलिसांना त्यांच्या कामकाजाच्या वेळेवर निर्बंध घालण्याचा कोणताही अधिकार नाही. पोलिसांचे काम हे कायदा व सुव्यवस्था राखणे आहे, गैरसमजातून किंवा आपल्या अकार्यक्षमतेमुळे कायदेशीर व्यवसायांवर गदा आणणे नाही. पोलीस अधीक्षकांनी काढलेले परिपत्रक हे केवळ बेकायदेशीरच नाही, तर उच्च न्यायालयाचा अवमान करणारे देखील आहे.'' आपल्या विधानाला अधिक आक्रमक स्वरूप देत ॲड. धन्नावत यांनी म्हटले की, ''जर पोलीस अधीक्षक आयपीएस तेघबीर सिंग संधू यांना जालना शहरातील नागरिकांना आणि व्यावसायिकांना सुरक्षा देणे शक्य नसेल, तर त्यांनी प्रामाणिकपणे तसे पत्र सरकारला लिहावे. मी जालना शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यास आणि नागरिकांना सुरक्षा देण्यास असमर्थ आहे, त्यामुळे माझ्या जागी एखाद्या सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करावी, असे त्यांनी सरकारला कळवावे. शहरातील गुन्हेगारी रोखण्याऐवजी, रात्री उशिरापर्यंत काम करून आपल्या कुटुंबाला बाहेर घेऊन जाणाऱ्या कामगारांना, रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करून आपले शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि हॉटेल-कॅफे चालवणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना वेठीस धरणे, ही कोणती कार्यक्षमता आहे?'' या परिपत्रकामुळे होणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक परिणामांवर बोट ठेवत ॲड. धन्नावत म्हणाले, ''दिवसभर ९ ते ९.३० पर्यंत दुकानात राबणारा कामगार रात्री १०.३० नंतर आपल्या कुटुंबासोबत बाहेर फिरू शकणार नाही. रात्रीच्या वेळी मिळणाऱ्या रोजगारावर शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी आहेत, त्यांच्या पोटावर पाय येणार आहे. हॉटेल आणि कॅफे मालकांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. पोलीस प्रशासनाच्या या एकाधिकारशाहीमुळे शहराच्या आर्थिक प्रगतीला खीळ बसेल.''ॲड. धन्नावत यांनी इशारा दिला आहे की, ''पोलीस अधीक्षकांनी हे काळे परिपत्रक तात्काळ मागे घ्यावे, अन्यथा या अन्यायाविरोधात आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल आणि न्यायालयात दाद मागावी लागेल. पोलिसांचे काम नागरिकांच्या कायदेशीर हक्कांचे रक्षण करणे आहे, त्यांच्यावर गदा आणणे नाही. जालना शहरातील व्यावसायिक आणि नागरिक या तुघलकी कारभारापुढे झुकणार नाहीत.'' या प्रकरणी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, मात्र या परिपत्रकामुळे शहरातील व्यापारी वर्गात आणि नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न सुटण्याऐवजी प्रशासन आणि नागरिक यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# ''जागेवर निवड संधी'' चे ९ मे रोजी जालना येथे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जालना अणि विक्रम टी प्रोसेसर प्रा. लिमिटेड जालना यांचे संयुक्त विद्यामाने दिनांक ९ मे, २०२६ शनिवार रोजी विक्रम टी प्रोसेसर प्रा. लिमिटेड बोरखेडी, सिंदखेड राजा रोड जालना येथे सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत (प्लेसमेंट ड्राईव्ह) ''जागेवर निवड संधी'' आयोजित करण्यात आला आहे. यासाठी २७ रिक्तपदे उपलब्ध आहेत. रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळाव्याचे आयोजीत करण्यात येत आहे. या मेळाव्यात विक्रम टी प्रोसेसर प्रा. लिमिटेड जालना यांचे नियुक्ते उमेदवारांची निवड करणार आहे. सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून २७ रिक्तपदे १) आयटीआय फिटर १ पद २) आयटीआय इलेक्ट्रिशन१ पद ३) आय टी आय मशीनिस्ट १ पद ४) वेअर हाऊस सहाय्यक ०२ पदे ५) अकाउंट असिस्टंट २ पदे ६) ऑफिस एच. आर. १ पदे ७) लोडिंग ड्रायव्हर १० पदे ८) सुपरवायझर ३ पदे ९) डाटा एन्ट्री ऑपरेटर ५ पदे इत्यादी, १८ ते ३५ वयोगटातील पात्रता धारक उमेदवारां साठी पदे उपलब्ध झालेली आहेत, सदर पदासाठी आयटीआय, बी. कॉम पदवीधर, एमबीए, कोणत्याही शाखेतील पदवी त्याच प्रमाणे ड्रायव्हर पदासाठी अनुभव धारक उमेदवारा यांच्यासाठी ही जागेवर निवड संधी आयोजित करण्यात येत आहे.

तरी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त नोकरी इच्छूक महिला व पुरुष उमेदवारांनी लाभ घ्यावा. मुलाखती साठी बायोडाटा एक प्रत सोबत ठेवावी. प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विक्रम टी प्रोसेसर प्रा. लिमिटेड बोरखेडी, सिंदखेड राजा रोड जालना सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे. असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी केले आहे.

## आमदार बबनराव लोणीकरांच्या पाठपुराव्याला यश;

# तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक

## धुळे सोलापूर महामार्ग भूसंपादन घोटाळा

**बीड । लातूर -** धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन प्रकरणातील बहुचर्चित कोट्यावधी रुपयांच्या कथित घोटाळ्याने आता गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आणि बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूर येथून ताब्यात घेतले आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात हा विषय लावून धरल्यानंतर आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

काय आहे नेमकं प्रकरण?

धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या जमिनींचा मोबदला देण्यासाठी सुरुवातीला ७० कोटी रुपये निश्चित करण्यात आले होते. मात्र, आमदार लोणीकर यांनी आरोप केला की, जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट आदेश तयार करून ही रक्कम २४० कोटी रुपयांनी वाढवण्यात आली. अशा प्रकारे एकूण मोबदला ३१० कोटींवर नेऊन त्यातील सुमारे ७५ कोटी रुपये बनावट लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले.

लोणीकरांचा विधानसभेत स्फोट आणि मंत्र्यांकडे पाठपुरावा

९ मार्च २०२६: आमदार लोणीकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नाद्वारे (क्र. २५२५८) या घोटाळ्याचा पर्दाफाश केला.

११ मार्च २०२६: महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लेखी पत्र देऊन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

आमदारांनी केवळ पत्रावर न थांबता तपास अधिकारी तथा बीडच्या पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा केला, ज्यामुळे तपासाला गती मिळाली.



४८ दिवसांचा काळा कारभार: संशयाची सुई पाठक यांच्याकडे

तपासातून समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, १ मार्च ते १७ एप्रिल २०२५ या केवळ ४८ दिवसांच्या काळात १५४ संशयास्पद आदेश काढण्यात आले. विशेष म्हणजे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची २२ एप्रिल रोजी बदली होणार होती, त्याच्या अवघ्या ५ दिवस आधी म्हणजेच १७ एप्रिल रोजी एकाच दिवसात ५० आदेश काढण्यात आले. यावरून या घोटाळ्याचे नियोजन किती नियोजनबद्ध होते, हे स्पष्ट होते.

महसूल मंत्र्यांची ठोस भूमिका आणि ची स्थापना

आमदार लोणीकरांच्या आक्रमक पवित्र्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. त्यांनी या घोटाळ्याची व्याप्ती पाहता विशेष तपास पथक () नियुक्त करण्याचे आदेश दिले. बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

''केवळ अटक नको, मालमत्ता जप्त करा'' लोणीकर

या कारवाईवर प्रतिक्रिया देताना आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिक आक्रमक भूमिका मांडली आहे:

''शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांना सोडणार नाही. दोषींना केवळ अटक करून भागणार नाही, तर ज्या ७५ कोटी रुपयांचा अपहार झाला आहे, त्याची वसुली करण्यासाठी दोषींच्या चल-अचल मालमत्ता जप्त कराव्यात आणि त्यांची बँक खाती गोठवावीत. जोपर्यंत शासनाचा एक-एक रुपया परत येत नाही, तोपर्यंत माझा लढा सुरूच राहील.''

पुढील कारवाई काय?

अविनाश पाठक यांना लातूरमधून ताब्यात घेतल्यानंतर आता त्यांना पुढील चौकशीसाठी बीडला आणले जाणार आहे. या घोटाळ्यात महसूल विभागातील अनेक बडे अधिकारी, कंत्राटी कर्मचारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर्स आणि काही मध्यस्थ (ज्यांनी १५ टक्के कमिशनची मागणी केली होती) रडारवर आहेत. पाठक यांच्या चौकशीतून प्रशासनातील आणखी अनेक मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# जालना जिल्ह्यातील ६५ कोतवाल व पोलीस पाटील ''आपदा मित्र'' प्रशिक्षणासाठी कोलाडकडे रवाना

**जालना । प्रतिनिधी -** नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या काळात गावपातळीवर तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील ६५ कोतवाल व पोलीस पाटील यांना ''आपदा मित्र'' योजनेअंतर्गत विशेष निवासी प्रशिक्षणासाठी रायगड जिल्ह्यातील कोलाड येथे रवाना करण्यात आले आहे. ही योजना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण () अंतर्गत राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

गावपातळीवरील प्रशासनात कोतवाल व पोलीस पाटील हे अत्यंत महत्त्वाचे घटक असून आपत्तीच्या वेळी नागरिकांपर्यंत सर्वप्रथम पोहोचणारे प्रतिनिधी म्हणून त्यांची भूमिका निर्णायक ठरते. याच पार्श्वभूमीवर त्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे सखोल व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जात आहे.

या प्रशिक्षणामध्ये पूरस्थितीतील बचावकार्य, सर्च अँड रेस्क्यू ऑपरेशन, जल बचाव ( ), दोरीच्या साहाय्याने बचावकार्य ( ), अग्निशमन तंत्र, आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली, प्राथमिक उपचार, सीपीआर (), जखमी व्यक्तींची सुरक्षित हाताळणी, स्थलांतर प्रक्रिया (), तसेच आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीतील समन्वय आणि आपत्तीनंतर पुनर्वसन या विषयांचा समावेश आहे.

कोलाड येथील राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण केंद्रात तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होणार असून प्रत्यक्ष आपत्तीजन्य परिस्थितीचे अनुकरण (  व ) करून प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात आपत्तीच्या प्रसंगी अधिक वेगाने, शिस्तबद्ध आणि प्रभावी प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधून या प्रशिक्षणासाठी सहभाग नोंदविण्यात आला आहे. त्यामध्ये जालना (०८), बदनापूर (०४), भोकरदन (०६), जाफ्राबाद (०६), परतूर (०७), मंठा (०३), अंबड (१९) आणि घनसावंगी (१२) अशा एकूण ६५ प्रशिक्षणार्थींचा समावेश आहे.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या प्रशिक्षित कोतवाल व पोलीस पाटील यांचा जिल्हा आपत्ती प्रतिसाद यंत्रणेत आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार असून ग्रामस्तरावर आपत्ती सज्जता निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक काजळकर तसेच नायब तहसीलदार निलम लुणावत यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देऊन हिरवी झेंडी दाखवत त्यांना प्रशिक्षणासाठी रवाना केले.

# जालना शहरातील विविध प्रश्नांबाबत भास्कर दानवे यांनी घेतली मनपा आयुक्तांची भेट

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील विविध नागरी समस्यांबाबत भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी आज दिनांक ७ एप्रिल रोजी महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी शहर विकास आराखडा, संत रोहिदास महाराज स्मारकासाठी जागा उपलब्ध करून देणे,शहरातील मोकाट जनावरे, मोकाट कुत्र्यांचा वाढता त्रास, तसेच मनपा नियमावलीच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी चर्चा करताना जालना शहराच्या डीपी प्लॅन ( ) संदर्भातही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहराचा नियोजित व सर्वांगीण विकास होण्यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, उद्याने, सार्वजनिक सुविधा तसेच भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन विकास आराखडा प्रभावीपणे राबवावा याचबरोबर जालना शहरात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या स्मारकासाठी महानगरपालिका हद्दीतील जागा उपलब्ध करून व सुशोभीकरणासाठी निधी निधीची तरतूद करण्यात यावी.

शहरातील अनेक भागांमध्ये मोकाट कुत्र्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिला यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे यावेळी निदर्शनास आणून



देण्यात आले. या समस्यांवर तातडीने उपाययोजना करून विशेष मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली. शहरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्था अतिक्रमण, अनियमित कामांवर प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे व नागरिकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद द्यावा अशी मागणी भास्कर आबा दानवे यांनी केली.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत,स्थायी समिती सभापती अशोक अण्णा पांगारकर,गटनेता महेश निकम, नगरसेवक अर्जुन गेही, अक्षय गोरंठ्याल,शशिकांत घुगे, अशोक पवार, आनंद झारखंडे, विष्णू डोंगरे, देविदास देशमुख, राजेश जोशी, सुनिल पवार, सुहास मुंडे, प्रा.सुजित जोगस, अमोल धानुरे, आकाश देशमाने, रोहित खोडवे, शिवराज नारियलवाले यांची उपस्थिती होती.

# जालन्यात अमली पदार्थांच्या विक्रीवर पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरामध्ये वाढत्या अमली पदार्थांच्या विळख्याला लगाम घालण्यासाठी पोलीस प्रशासन सध्या ॲक्शन मोडमध्ये आले आहे. गांधीनगर परिसरातील एका गोडाऊनवर छापा टाकून सदर बाजार पोलिसांनी गुंगीकारक इंजेक्शन आणि नशेच्या गोळ्यांचा मोठा साठा जप्त केला असून, या प्रकरणी एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, ४ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास सदर बाजार पोलीस ठाण्याचे डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांना खात्रीलायक बातमी मिळाली होती की, गांधीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील संजरी सप्लीमेंट गोडाऊनमध्ये अवैध अमली पदार्थांची विक्री होत आहे. माहिती मिळताच पोलिसांनी वेळेचा विलंब न लावता तातडीने हालचाली सुरू केल्या.

पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी, पंच आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या ताफ्याने दुपारी ३.३० वाजता संबंधित गोडाऊनवर धाड टाकली. यावेळी पोलिसांनी गोडाऊनची कसून झडती घेतली असता, तिथे नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या ( ) च्या २० बाटल्या आणि इतर गुंगीकारक गोळ्या असा एकूण २३,४८० रुपये किमतीचा बेकायदेशीर मुद्देमाल आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी गोडाऊन मालक शेख जमीर शेख जहीर (वय ३० वर्ष, रा. कानडी वस्ती, ऑपरेशन नगर जवळ, जालना) याला अटक केली आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेली इंजेक्शन ही वैद्यकीय सल्ल्याशिवाय वापरणे जीवावर बेतू शकते, मात्र नशा करण्यासाठी त्याची विक्री केली जात होती, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ही धडाकेबाज कामगिरी पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात पोलीस निरीक्षक संदीप भारती, पोउपनि सचिन सानप, नजीर पटेल, दुर्गेश गोफणे, अझीम शेख, गणेश तेजनकर, राहुल कटकम, धनंजय लोढे आणि महिला पोलीस कर्मचारी दीपाली भागवत यांचा समावेश होता. शहरात कोठेही अशा प्रकारचे अवैध व्यवसाय किंवा अंमली पदार्थांची विक्री होत असल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, जेणेकरून तरुण पिढीला या व्यसनापासून वाचवता येईल.

# जालना जिल्ह्यात आज 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या नागरिक केंद्रित उपक्रमांतर्गत जालना जिल्ह्यात शुक्रवार, ८ मे २०२६ आजरोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सहा मंडळ स्तरांवर हे शिबिर भव्य स्वरूपात घेण्यात येणार असून, नागरिकांच्या विविध शासकीय समस्या, तक्रारी, अर्ज व प्रलंबित प्रकरणांचे तातडीने निवारण करण्यावर भर दिला जाणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी बैठकीस प्र. निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, नायब तहसीलदार किशोर तायडे, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगर परिषद व नगर पंचायतींचे मुख्याधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी बैठकीत शिबिरांचे नियोजन, समन्वय, नागरिकांना मिळणाऱ्या सेवा आणि तक्रार निवारण प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिबिरांमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज स्वीकृती, प्रमाणपत्रे, महसूलविषयक सेवा तसेच इतर विभागांच्या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. शिबिरांमध्ये येणाऱ्या नागरिकांना आवश्यक पायाभूत सुविधा, पुरेसे मनुष्यबळ, मार्गदर्शन कक्ष, तक्रार नोंदणी व निवारण यंत्रणा उपलब्ध राहील. नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि समाधानकारक सेवा देण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

०८ मे रोजी खालीलप्रमाणे तालुकानिहाय महाराजस्व अभियान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना तालुका : मुक्तेश्वर लॉन्स, जालना

बदनापूर : आरती इंग्लिश स्कूल, बदनापूर

अंबड : मत्स्योदरी देवी संस्थाचे अहिल्यादेवी सभागृह, अंबड

घनसावंगी : जिल्हा परिषद शाळा, तीर्थपुरी

भोकरदन : नगर परिषद मंगल कार्यालय, भोकरदन

जाफराबाद : छत्रपती शिवाजी महाराज चौक, कुंभारझरी

जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांना या शिबिरांचा जास्तीत-जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या अडचणी, समस्या व शासकीय कामासंदर्भातील प्रकरणे संबंधित शिबिरात मांडून शासनाच्या सेवा योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय भरती मेळाव्याचे १२ मे रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन, जि.जालना.,यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक १२ मे,२०२६ मंगळवार रोजी स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन, जि.जालना, येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ''पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळावा तसेच मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण भरती मेळावा आयोजीत करण्यात येत आहे. या मेळाव्यात रोजगार देणाऱ्या विविध नामांकित कंपन्या व नियोक्ते उपस्थित राहुन व प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करणार आहे. सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून ४९ रिक्तपदे एसएससी, एचएससी, कोणतेही पदवीधर, व पदव्युत्तर १८ ते ४५ वयोगटातील पात्रता धारक उमेदवारासाठी पदे उपलब्ध झालेली आहेत. या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त नोकरी इच्छूक महिला व पुरुष उमेदवारांनी लाभ घ्यावा. तसेच, उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी किमान पाच प्रतीत बायोडाटा व फोटो आणि आधारकार्ड, सेवायोजन नोंदणी कार्ड, इ. कंपनींना देण्यासाठी सोबत ठेवावे. इच्छुक उमेदवारांनी अद्यापर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास .... या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा यापुर्वी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील रिक्तपदे व पात्रते प्रमाणे मॅचिंग होणाऱ्या पदांसाठी ऑनलाईन ॲप्लाय करुन लॉगीन करावे आणि प्रत्यक्ष मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी सकाळी ९.०० वाजता उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी ://... या संकेतस्थळावर भेट देऊन आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या सदराखाली जालना जिल्हा निवडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा यामधील तपशिल पाहावा. याबाबत काही अडचण आल्यास सहाय्यासाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३या दूरध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा . या ई-मेलवर संपर्क करावा. या मेळाव्याचा जास्तीत-जास्त नोकरी उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी केले आहे.

# सावधान! तुमच्या खिशातला मोबाईल ''स्मार्ट होतोय अन् मेंदू मात्र गुलाम

## मुक्ता चैतन्य यांनी दिला धोक्याचा इशारा, जालन्यात मानस फाउंडेशनच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी -** आपण स्मार्टफोन वापरत आहोत की स्मार्टफोन आपल्याला वापरत आहे, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. तंत्रज्ञान हे प्रगतीसाठी असावे, गुलामगिरीसाठी नाही. मात्र, सध्याची पिढी इंटरनेटच्या आभासी जगात इतकी गुरफटली आहे की, त्यांच्या विचार करण्याच्या क्षमतेवरच मर्यादा येत आहेत.

मोबाईल हे आजच्या काळातील ''डिजिटल व्यसन असून त्याची नशा नकळत आपल्याला आणि आपल्या मुलांना संपवत आहे, असे परखड प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका व डिजिटल जगाच्या अभ्यासक मुक्ता चैतन्य (पुणे) यांनी केले. जालना येथील मानस फाउंडेशनच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ''हातातला स्मार्टफोन, मेंदूला स्मार्ट बनवतोय की गुलाम? या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या.

जालना येथील उद्योजक सुनील रायठठ्ठा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज फातेमा यांची प्रमुख उपस्थिती होती. मुक्ता चैतन्य यांनी तंत्रज्ञानाच्या मागे असलेल्या विज्ञानाचा उलगडा करताना सांगितले की, सोशल मीडियावरील प्रत्येक नोटिफिकेशन आणि लाईक आपल्या मेंदूमध्ये डोपामाइन नावाचे रसायन उत्सर्जित करते. हे रसायन आपल्याला क्षणिक आनंद देते, ज्यामुळे आपण वारंवार मोबाईल तपासत राहतो. हे एका प्रकारच्या ड्रग्सच्या व्यसनासारखेच असून यामुळे आपली एकाग्रता पूर्णपणे नष्ट होत आहे. आज दुसरी-तिसरीतील लहान मुलेही चॅट जीपीटीसारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत, ज्यामुळे त्यांची नैसर्गिक भाषा विकास प्रक्रिया आणि आकलन क्षमता खुंटत चालली आहे. आपण ऑनलाइन पोस्ट केलेली वैयक्तिक माहिती डार्क वेबवर विकली जाऊ शकते, तसेच मुलांच्या फोटोंचा गैरवापर (मॉर्फिंग) होण्याचे प्रमाण वाढल्याने डिजिटल वावरताना डिजिटल विवेक जागृत ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात सुनील रायठठ्ठा म्हणाले की, तंत्रज्ञान प्रगतीसाठी असावे, पण जेव्हा ते मानवी नात्यांच्या आड येते, तेव्हा ती प्रगती नसून अधोगती आहे.

प्रास्ताविकात मानस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेकर यांनी स्पष्ट केले, अनेक रुग्ण येतात ज्यांच्या मानसिक आजाराचे मूळ कारण हे मोबाईलचे व्यसन आहे. औषधांपेक्षा जाणीव निर्माण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. आपण आपल्या घराचे दरवाजे बंद करतो, पण मोबाईलच्या माध्यमातून जगातील कचरा आपल्या मुलांच्या बेडरुमपर्यंत पोहोचला आहे, ही चिंतेची बाब आहे. याप्रसंगी कृषीभूषण विजयअण्णा बोराडे, डॉ. गणेश अग्निहोत्री, प्रा. सुरेश लाहोटी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दूर्वा संन्यासी व श्री. दिनेश संन्यासी यांनी गाणे मनातले हा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास सदाव्रते, पाहुण्यांचा परिचय डॉ. सुजाता देवरे तर आभार विनोद जैतमहाल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. शीतल अंबेकर, प्रा. डॉ. सुजाता देवरे, डॉ. यशवंत सोनुने, सतीश खरटमल, डॉ. सुहास सदाव्रते, विनोद जैतमहाल, डॉ. वासुदेव उगले, अभय वाकडे, मनोज लोणकर यांनी परिश्रम घेतले.

**नागरिकांना सावधगिरीचा इशारा**

स्मार्टफोनच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी मुक्ता चैतन्य यांनी काही व्यावहारिक



उपाय सुचवले. त्यात जेवताना आणि झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईल दूर ठेवावा, मुलांसोबत गप्पा मारण्यासाठी आणि मैदानी खेळांसाठी वेळ राखीव ठेवावा, मोबाईलमधील अनावश्यक नोटिफिकेशन्स बंद ठेवावीत, आठवड्यातून किमान एक दिवस डिजिटल उपवास पाळावा. एकाग्रता वाढवण्यासाठी दिवसातून किमान ३ मिनिटे स्तब्ध राहून स्व-शोध घ्यावा. मुलांच्या हातात स्क्रीन देण्यापेक्षा त्यांना पुस्तकं आणि मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.